# PHYSICAL FACILITIES FOR PHYSICAL DISABLED STUDENTS AND STAFF



























सकाळ
६ मार्च २०१७



कोल्हापूर : गोखले महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या कार्यक्रमावेळी सचिन जाधव, अजय वणकुंद्री, डॉ. मंजिरी देसाई-मोरे, प्राचार्य डॉ. जे. बी. पिष्टे, संजय डेंशे.

## गोखले महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

कोल्हापूर, ता. ५ : गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन झाला. यानिमित्त 'दिव्यांग लोकांसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान' यावर व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. जे. बी. पिष्टे अध्यक्षस्थानी होते. भारतीय नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्रमुख वक्ते अजय वणकुंद्री यांनी विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात विविध विकसित झालेले सॉफ्टवेअर, त्याच्या माध्यमातून दिव्यांगांना होत असलेले लाभ विशद केले. शिवाजी विद्यापीठाच्या रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सहायक संचालक डॉ. सचिन जाधव यांनी दिव्यांगांना असणाऱ्या विशेष संधी यावर मार्गदर्शन केले. शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी सर्व दिव्यांगांचे स्वागत करून त्यांना सहकार्य व मदतीचे आश्वासन दिले.

**लोकमत**

१

## दिव्यांग विद्यार्थ्यांचा 'गोखले'मध्ये सत्कार

कोल्हापूर : येथील गोखले कॉलेजमध्ये १३ दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार स्पर्श फौंडेशनचे अध्यक्ष अजय वणकुंद्रे यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. एस. एच. पिसाळ होते. यावेळी प्रा. आर. एच. पायमल, एस. एन. मोरे, आर. बी. भुयेकर, आदी उपस्थित होते.

http://s3.ap-south-1.amazonaws.com/epaper.lokmat/eNewspaper/News/LOK/HKHK/2018/12/18/ArticleImages/18D0EA0.jpg

Posted 18th December 2018 by Prin. M. R. Desai Library
Labels:

**पुण्य नगरी**

१

## गोखले महाविद्यालयात दिव्यांग मुलांचा सत्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात जागतिक अपंग दिनानिमित्त अंध व अपंग विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी उपप्राचार्य प्रा. एस. एच. पिसाळ होते, तर प्रमुख उपस्थिती स्पर्श फाऊंडेशनचे अजय वणकुंद्रे यांच्यासह पर्यवेक्षक एस. एन. मोरे, आर. बी. भुयेकर, एस. आर. राक्षसे, एस. जी. पाटील, आर. के. हराळे, आर. ए. बागवान उपस्थित होते.

Source: -

Posted 15th December 2018 by Prin. M. R. Desai Library
Labels:

18-10-24 HELP TO BLIND STUDENT



# 17-2-28 – JOB OPP. FOR PHYSICAL DISABLED
















